MHST010022512014

**रे.दि.अपील क्र.२२१/२०१४**
(हणमंत गणपत चव्हाण विरुध्द
श्रीमती जगुबाई लक्ष्मण शिर्के व इतर.)

## निशाणी क्र.२८ खालील आदेशः-

अपेलंटतर्फे रिस्पॉन्डंट क्र.४ च्या वारसांच्या नावात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेकरीता प्रस्तुत अर्ज दिला आहे.

२) निशाणी क्र.२८ वरील अर्ज, त्यापुष्टयर्थ सादर केलेले प्रतिज्ञापत्र व रिस्पॉन्डंटतर्फे सादर केलेले म्हणणे वाचले.

३) अपेलंट यांच्या कथनाप्रमाणे मयत रिस्पॉन्डंट क्र.४ यांचे वारस रेकॉर्डवर घेताना रिस्पॉन्डंट क्र.४ब स्वाती व रिस्पॉन्डंट क्र.४क प्रिती यांच्या नावापुढे 'रविंद्र' ऐवजी 'राजेंद्र' असे हस्तदोषाने व नजरचुकीने नमुद झाले. सदर बाब अपेलंट यांच्या लक्षात येताच तातडीने सदर दुरुस्ती करणेची परवानगी मागितली आहे. अपेलंटच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत दुरुस्ती ही किरकोळ व तांत्रीक स्वरुपाची असुन त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. दुरुस्ती मंजूर केल्याने रिस्पॉन्डंट/मुळ प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट पक्षकारांमधील वाद अंतिमतः निर्णीत होण्याच्या दृष्टीने व अपीलातील गुंतागुंत टाळण्याच्या दृष्टीने मदतीचे होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४) रिस्पॉन्डंट यांनी दुरुस्तीस हरकत घेऊन कामकाजात दिरंगाई करण्याच्या दृष्टीने जाणुनबुजून अर्ज दिल्याचा आक्षेप घेतला.

५) अपेलंट यांची मागणी व रिस्पॉन्डंट यांचा आक्षेप विचारात घेतले. मागणी केलेली दुरुस्ती ही रिस्पॉन्डंट क्र.४ यांच्या वारसांच्या नावाबाबत असुन केवळ त्यांच्या नावात 'रविंद्र' ऐवजी 'राजेंद्र' असा मजकुर दुरुस्त करणेची मागणी केली आहे. रिस्पॉन्डंटतर्फे दिरंगाई करणेच्या उद्देशाने जाणूनबुजून अर्ज दिल्याचे कथन केले. परंतु प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता त्यामुळे प्रकरणाच्या स्वरुपात कोणताही बदल होत

नाही. प्रकरणाचा निकाल करण्यासाठी सदर दुरुस्ती आवश्यक आहे. सदर बाब अपेलंटच्या निदर्शनास आलेवर तात्काळ दुरुस्तीस परवानगी मागितल्याने प्रस्तावित दुरुस्ती करणेस परवानगी देणे योग्य होईल. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

(१) अर्ज (निशाणी क्र.२८) मंजुर करणेत येत आहे.

(२) अपेलंट यांनी या आदेशापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत अर्जात नमुद केलेप्रमाणे रिस्पॉन्डंट क्र.४ब व ४क यांच्या नावात दुरुस्ती करणेची आहे.

NITIN HANMANTRAO JADHAV

Digitally signed by NITIN HANMANTRAO JADHAV
Date: 2024.04.10 15:29:20 +0530

सातारा. (नि.ह. जाधव)

दिनांक – १०/०४/२०२४. जिल्हा न्यायाधीश–३, सातारा